# Bharatiya Janata Party

C.D.O. Barrack No.1, Opp. Yogekshema, Vasantrao Bhagwat Chowk,
Nariman Point, Mumbai 400 020. Tel: 22022050


## गहू घोटाळा : सरकार आयात गव्हाला प्रतिकिलो १८ रु. मोजणार
## – हजारो कोटी रुपयांचा घोटाळा – डॉ. किरीट सोमैया

गहू आयात घोटाळा हा प्रत्यक्षात 'गव्हाचा हेजिंग घोटाळा' असल्याचे केंद्रातील यूपीए सरकारने स्वत:च मान्य केले आहे. सरकारी मालकीच्या 'प्रोजेक्ट इंजिनियरिंग कॉर्पोरेशन' सार्वजनिक उद्योगाने ५० हजार टन आयात गव्हासाठी ३८५ डॉलर या दराने निविदा भरली होती. हा भाव १५.७५ रुपये प्रतिकिलो एवढा येत होता. तर 'कारगिल'सारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्याच गव्हाला ४३५ डॉलर म्हणजे प्रतिकिलो १७.७५ रुपये असा लावला होता.

या गहू आयात घोटाळ्यापायी सरकारला आता ३०००कोटी रुपयांहून अधिक फटका बसणार असल्याचा आरोप भाजपा नेते डॉ. किरीट सोमैया यांनी केला आहे. भारतीय शेतकऱ्यांना किलोमागे ७.५०रु. हा दर दिला जात असताना निकृष्ट प्रतीच्या गव्हासाठी किलोमागे १७.७५रु. हा दर देण्याची कॉंग्रेस व यूपीए सरकारची काय नीती आहे असा सवाल भाजपने केला आहे.

प्रोजेक्ट इंजिनियरिंगच्या अधिकाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, आम्ही 'शिकागो बोर्ड ऑफ ट्रेड'वर आमची 'पोझिशन' तयार केली होती. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांपेक्षा कमी दर आम्ही देऊ शकत होतो. कारगिलने स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनला जो दर दिला त्यापेक्षा स्वस्त दरात आम्ही गहू पुरवू शकत होतो. याचे कारण ज्या वेळी गव्हाचे भाव खूप कमी होते त्याचा फायदा उठवत आम्ही 'पोझिशन' घेतली होती.

मे महिन्याच्या अखेरीस बहुराष्ट्रीय कंपन्यांनी २६७ डॉलर म्हणजेच १०.६७रु. प्रति किलो असा दर नमूद केला होता. मात्र देशातील शेतकऱ्यांना अवघा ७.५०रु. असा दर दिला जात असताना परदेशी कंपन्यांना १०.६७रु. प्रति किलो असा दर दिल्याने मोठा असंतोष निर्माण होईल असे कारण देत अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक खात्याने हा दर फेटाळून लावला होता.

यूपीए सरकारने, विशेषत: अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक हित मंत्रालयाने बहुराष्ट्रीय कंपन्यांना शिकागो कमोडिटी एक्सचेंजवर गव्हाचे 'हेजिंग' करण्याची तसेच दुप्पट नफा कमावण्याची संधी दिली आहे असा आरोप भाजपाने केला आहे.

गहू आयातीचा दर निश्चित करून चढ्या भावाला ऑर्डर देण्याची तारीख ३ सप्टेंबर ही आहे असे समजते. देशातील गव्हाचे उत्पादन ६९ दशलक्ष टनाहून ७५ दशलक्ष टनांवर गेले असताना असा प्रकार घडणे हे एक आश्चर्यच असल्याची प्रतिक्रिया भाजपने व्यक्त केली आहे. तसेच या गहू आयात घोटाळ्याची सीबीआयमार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे.

विद्यमान आयातीचे दर–एसटीसी

| क्र. | कंपनीचे नाव | प्रमाण(मे.टन) | किंमत | |
|---|---|---|---|---|
| | | | डॉलर प्रति मे.टन | रु. प्रति किलो |
| १. | प्रोजेक्ट इंजिनियरिंग | ५०,००० | ३८५ | १५.७८ |
| २. | ग्लेन्कोर (बहुराष्ट्रीय) | ३,००,००० | ३८५ | १५.७८ |
| ३. | टेफर | ७०,००० | ४०० | १६.४० |
| ४. | ॲमेरोपा | २५,००० | ते | ते |
| ५. | स्टार कॉम | ५,००० | ४३४ | १७.७९ |
| ६. | कारगिल | ८०,००० | | |
| | एकूण | ५.३ लाख | ३८५ ते ४३४ | १५.७८ ते १७.८० |

एसटीसी – म्हणजेच सरकार ३ सप्टेंबरला १७ रु. प्रति किलो (सरासरी किंमत) या दराने ५.३ दशलक्ष मे. टन गव्हासाठी ऑर्डर देणार आहे.

भारतीय शेतकऱ्यांना ८.५०रु. प्रति किलो हा दर देण्यात आला होता. देशातंर्गत बाजारात चांगल्या प्रतीच्या गव्हाची किरकोळ विक्री किंमत १२ रु. प्रति किलो आहे.

२००६–०७ या वर्षी ५० लाख टन गहू ८.४०रु. प्रति किलो या दराने आयात करण्यात आला होता.

**प्रसिद्धी सचिव**